MHKO110000362019

**नियमित दिवाणी दावा क्र. ०५/२०१९ मधील निशाणी क्रमांक ५४ खालील आदेश**

**बापु गजानन हांडे वगैरे**

**वि.**

**जयश्री उत्तम नलावडे वगैरे**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ६ रूल १७ प्रमाणे दावा मध्ये दुरुस्ती करून घेणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करून अर्ज मंजूर करण्यास विरोध दर्शविला आहे.

**०२.** अभिलेखाचे अवलोकन केले. युक्तिवाद ऐकला.

**०३.** वादी यांचे कथन असे की, वादी यांनी प्रस्तुत दावा प्रतिवादींच्या विरुद्ध दावा हक्कज्ञापन, कायम मनाई व दावा मिळकतीचे तथाकथीत खरेदीपत्र रद्द होउन मिळणेकरिता दाखल केला आहे. दावा मिळकतीचे अद्याप वाटप झालेले नाही. वादीने अर्जामध्ये नमूद केलेप्रमाणे दाव्यामध्ये, दाव्याच्या तपशीलात व विनंती अर्जात दुरूस्ती करणेची परवानगी मागितली आहे. सदरची दुरूस्ती केल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, वादी यांनी सदर अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**०४.** प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल करून असे कथन केले की, प्रस्तुत दाव्यामध्ये मुद्दे काढलेले असुन या स्टेजला सदरचा अर्ज दाखल करता येणार नाही. वादी यांनी दाव्यामध्ये नमूद केलेली दुरूस्ती ही चुकीची आहे. सदर कामी वादी यांनी अद्याप पुरावा दाखल केलेला दिसून येत नाही. प्रकरण लांबवण्याच्या हेतूने सदर अर्ज दाखल केला आहे. अर्ज दाखल करावा असे कोणतेही कारण घडलेले नाही. सबब, अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती ते करतात.

**०५.** वादी यांनी प्रस्तुत दावा प्रतिवादींच्या विरुद्ध दावा हक्कज्ञापन, कायम मनाई व दावा मिळकतीचे तथाकथीत खरेदीपत्र रद्द होउन मिळणेकरिता दाखल केला आहे. प्रस्तुत प्रकरणात नि. ५० वर मुद्दे काढले असून प्रकरण वादींच्या पुराव्याकरिता प्रलंबित आहे.

**०६.** दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ६ नियम १७ अन्वये न्यायालयास दाव्यातील कार्यवाहीच्या कोणत्याही टप्यावर दाव्यातील कोणत्याही पक्षकारास त्याच्या वादकथनास न्याय असेल अशारितीने व अशा अटींवर फेरबदल करण्याची किंवा सुधारणा करण्याची मुभा देण्यात येईल आणि पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व सुधारणा केल्या पाहिजेत. परंतू न्यायचौकशी सुरू झाल्यानंतर, पक्षकारांनी योग्य ती खबरदारी घेवून सुध्दा न्यायचौकशी सुरू होण्यापूर्वी ती बाब पुढे आणता आली नाही याबाबत न्यायालयाचे समाधान झाले असल्याखेरीज सुधारण्यासाठीचा अर्ज अनुज्ञेय असणार नाही. वरील तत्वांचा विचार करता सदरच्या अर्जाचा निर्णय देण्यात येत आहे.

**०७.** अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी नं. १ व २ तसेच प्रतिवादी नं. २ व ३ हे सख्खे भाउ-बहीण आहेत. दाव्यातील कथनांनुसार प्रथमदर्शनी असे दिसून येते की, प्रतिवादी नं. २ व ३ यांनी दावा मिळकत तथाकथित रजि. दस्त नं. ७७९०/२०१८ अन्वये बोगस खरेदीपत्रान्वये प्रतिवादी नं. १ यांना विक्री केली आहे. दाव्यातील कारण पाहता वादींना तथाकथित खरेदीपत्राची बाब दि. २०/१२/२०१८ रोजी समजून आली. सदरचा दावा हा सन २०१९ रोजी दाखल केला आहे. वादी यांना दावा दाखल करणेच्या आधी तथाकथित खरेदीपत्राबाबत माहिती होती. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दि. ०६/१०/२०२५ रोजी दाखल केला आहे. सदरचा अर्ज दाखल करण्यास अंदाजे ६ वर्षाचा विलंब झाला असून सदर अर्जात विलंबा बाबत कोणतेही कारण नमूद नाही.

**०८.** तसेच, या टप्प्यावर प्रकरणाच्या गुणवत्तेचा विचार न करता जर वादीच्या वडीलांनी केलेल्या मृत्यूपत्राच्या आधारे वादीस दावा मिळकतीत हक्क प्राप्त झाले आहेत व त्यानुसार त्यांचा अग्रहक्क आहे, असे असताना दावा दाखल करतेवेळी त्यासंबंधी अग्रहक्काचे कथन का केले नाही याचे पुरेसे समाधानकारक कारण नमूद केले नाही.

**०९.** भारतीय मर्यादा कायदा कलम ९७ नुसार, अग्रहक्क लागू करण्यासाठीचा दावा खरेदीदाराने विक्री केलेल्या मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेतल्यापासून किंवा विक्रीपत्राची नोंदणी झाल्यापासून एका वर्षाच्या आत दाखल करणे आवश्यक आहे. वादी सदर अर्जान्वये जी

अग्रहक्कानुसार दुरूस्ती मागत आहेत ती त्यांना दावा दाखल करतेवेळी माहित असून देखील त्यावेळी दाव्यामध्ये का नमूद केली नाही याचे कोणतेही समाधानकारक व संयुक्तिक कारण नमूद केलेले नाही. वादीच्या प्रस्तावित दुरुस्तीला परवानगी दिल्यास प्रतिवादीच्या बाजुने प्राप्त झालेल्या कायदेशीर हक्कास बाधा येणार आहे.

**१०.** एकंदरीत, वादी हा त्याच्या प्रस्तावित दुरुस्तीद्वारे दाव्यातील तुटी भरून काढण्याचा आणि कमतरता लपवण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे, प्रतिवादीच्या बाजूने निर्माण झालेला हक्क हिरावून घेण्याचा प्रयत्न करत आहे. वादीच्या बाजूने कोणतीही योग्य खबरदारी दाखवली गेलेली नाही.

**११.** प्रत्येक पक्षकार या आशेने न्यायालयात येतो की त्यांच्या बाजूने दिलासा मिळेल आणि याच आशेने ते उपलब्ध असलेले सर्व संभाव्य पर्याय शोधण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे, वादीवर खर्च लावण्याची आवश्यकता नाही. सबब, कायदेशीर तरतुदी आणि योग्य त्या पुराव्याच्या अधीन राहून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | सदरचा नि. ५४ चा अर्ज नामंजूर करण्यात येतो. |
| २. | खर्चाबाबत आदेश नाही. |

sd/-
**( श्रीमती. आर. एस. मोरे)**
३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर
पेठवडगाव.

दिनांकः- २१/०४/२०२६
पेठवडगाव.